किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत
महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार
मंडळाची पुर्नरचना करणेबाबत........

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : किवेअ-२०१५/५७१/प्र.क्र.२१४/कामगार ७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१८.

<u>वाचा:-</u> १) उद्योग, उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय,क्रमांक किवेअ १.२०१०/ प्र.क्र.१२५७/ पुनर्बांधणी-२/कामगार-७, दिनांक २३ मे, २०१३.
२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय,क्रमांक किवेअ १.२०१०/ प्र.क्र.१२५७/ पुनर्बांधणी-२/कामगार-७, दिनांक १७ जून, २०१३.
३) उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय, क्रमांक किवेअ १.२०१०/ प्र.क्र.१२५७/ पुनर्बांधणी-२/कामगार-७, दिनांक ३ सप्टेंबर, २०१४.
४) उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक किवेअ-२०१५/५७१/प्र.क्र.२१४/कामगार ७, दिनांक : १० सप्टेंबर, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम ७ आणि महाराष्ट्र किमान वेतन नियम १९६३ मधील नियम ४ च्या तरतुदीनुसार संदर्भाधीन क्र. ०१ येथील दिनांक२३ मे २०१३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. किमान वेतन नियम, १९६३ च्या नियम ४ अन्वये मंडळाचा कालावधी नियुक्ती पासून तीन वर्षाचा असून तो दिनांक२२ मे २०१६ रोजी संपुष्टात आला आहे.

संदर्भाधीन क्र. ०४ येथील दिनांक १० सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. रघुनाथ बबनराव कुचिक मु.पो. नारायणगांव ता. जुन्नर जिल्हा पुणे यांची महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळातील मालक, कामगार आणि स्वतंत्र प्रतिनिधींची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

किमान वेतन अधिनियम,१९४८ कलम ७ आणि महाराष्ट्र किमान वेतन नियम,१९६३ मधील कलम ४ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची शासन खालील प्रमाणे पुनर्रचना करीत आहे:-

| |
|---|
| अध्यक्ष- श्री. रघुनाथ बबनराव कुचिक मु.पो. नारायणगांव ता. जुन्नर जिल्हा पुणे |
| सदस्य सचिव:- उप आयुक्त कामगार, मुंबई. |

CamScanner

| अ.क्र | मालक प्रतिनिधी | कामगार प्रतिनिधी | स्वतंत्र प्रतिनिधी |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुबोध रविंद्र देऊळगावकर | श्री. राजेश मनोरंजनसिंग गौतम | श्री. विश्वेश प्रभाकर कुलकर्णी, |
| २ | श्री. राजेश अनिक दुबेवार | ॲड शैलेश मुंजे | ॲड. श्रीधर व्यवहारे |
| ३ | श्री. मकरंद प्रभाकराव देशपांडे | श्री. हरिष वाघ | श्री. अमित सुडे |
| ४ | श्री. निरंजन रामसिंग परदेशी | श्री. प्रभाकर मते | श्री. विक्रम सुदाम नागरे |
| ५ | श्री. राजीव वसंत सावरकर | श्री. राम साळगावकर | श्री. प्रतिक बाबासाहेब घोडे |
| ६ | श्री. निरंजन बोरसे | श्री. केशव हनुमंत घोळवे | |
| ७ | श्री. कन्हैयाला देविदास शार्दुल | श्री. सुशांत हिंदुराव गायकवाड | |
| ८ | श्री. फईम अमिन पटेल | श्री. हरी नारायण चव्हाण | |
| ९ | श्री. राजेश बलराम पेवल | श्री. दिपक भागवत ढाकणे | |
| १० | श्री. योगेश मानधनी | श्री. सुधाकर पाटील | |

२. किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम ५ अन्वये सदर समिती संपूर्ण महाराष्ट्रातील उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनाबाबत अभ्यास करुन किमान वेतन दराबाबत आवश्यक सल्ला /शिफारशी शासनास सादर करील.

३. अशासकीय सदस्यांना प्रवास/दैनिक भत्ता, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. प्रवास१०१० /प्र.क्र.२ /सेवा-५, दिनांक ०३ मार्च २०१०मधील परिच्छेद १२ मध्ये खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार राहील. "राज्य / विभाग/ जिल्हा स्तरावरील समिती /मंडळ/ आयोगयावर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांना रु.८९००/-व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या दराने प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल; मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. समिती/मंडळ / आयोग वगैरेवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या आमदार /खासदार यांचा प्रवास भत्ता /दैनिक भत्ता, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः टिआरए१४७०/१३१/अठरा, दिनांक २७ जानेवारी,१९७१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आमदार व खासदार यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जाईल. अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्ता मंजूरी साठी रेल्वेच्या अनुज्ञेय वर्गाने केलेल्या प्रवासाच्या तिकिटाचा क्रमांक व दिनांक इत्यादी तपशील देण्याची आवश्यकता नाही."

तसेच प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय असणार नाहीत. तथापि सदर प्रकरणी शासनाने मान्यता दिलेल्या समितीमधील सदस्यांचा दर्जा निश्चित करणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाचे सचिव हे सर्व सदस्यांचे प्रवास व दैनिक भत्ता यासंदर्भात नियंत्रक प्राधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी असतील.

५. या कारणास्त व होणारा खर्च मागणी क्र.के-४, २२३०- कामगार व सेवा योजन (०१) कामगार (१०१) औद्योगिक संबंध (१०१) (०४) विशेष चौकशी समित्या (२२३००५१२) या लेखाशिर्षाखालील चालू वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.



CamScanner

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८१११४१६५८११९६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.11.14 17:04:49 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
५) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
६) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,
७) कामगार आयुक्त, मुंबई, (१५प्रती)
८) अपर कामगार आयुक्त,पुणे नागपूर,
९) कामगार उप आयुक्त, ठाणे /नाशिक/औरंगाबाद,
१०) सल्लागार मंडळाचे अध्यक्ष (म्हात्रे)
११) सल्लागार मंडळाचे सचिव व समितीचे सर्व सदस्य (कामगार आयुक्त, मुंबई यांचे मार्फत)
१२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक,
१४) उप सचिव (कामगार), यांचे स्वीय सहाय्यक,
१५) सर्व मंत्रालयीन विभाग,
१६) कामगार विभागातील सर्व कार्यासने,मंत्रालय,मुंबई,
१७) निवडनस्ती (कामगार ७).



CamScanner

किमान वेतन अधिनियम,१९४८ अंतर्गत महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची पुर्नरचना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन शुद्धीपत्रक क्रमांक : किवेअ -२०१५/५७१/प्र.क्र.२१४/कामगार ७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६ डिसेंबर, २०१८.

वाचा :- १) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक किवेअ-२०१५/५७१/प्र.क्र.२१४/कामगार-७, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.
२) कामगार आयुक्त पत्र क्र.काआ/किवेअ/मंडळ/पुनर्रचना/२०१८/कार्या-१०, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना:-**

किमान वेतन अधिनियम,१९४८ कलम ७ आणि महाराष्ट्र किमान वेतन नियम,१९६३ मधील कलम ६ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची शासन निर्णय दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ द्वारे पुनर्रचना केली आहे. सदर शासन निर्णयामध्ये मंडळाचे सदस्य सचिव म्हणून उप आयुक्त कामगार, मुंबई यांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र किमान वेतन नियम,१९६३ मधील नियम ६ नुसार मंडळासाठी सचिव नेमण्याची तरतूद आहे. तथापि, शासन निर्णयामध्ये सदस्य सचिव असे पदनाम नमूद आहे. सबब, सदर पदनामामध्ये "सचिव" असा बदल करुन मंडळाच्या सचिव पदी सहायक कामगार आयुक्त (ग्रावि), मुंबई यांची नियुक्ती करण्याची विनंती कामगार आयुक्त यांनी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे. त्यानुषंगाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीचा शासन निर्णय सुधारीत करण्यात येत आहे:-

**शुद्धीपत्रक:-**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील सदस्य सचिव उप आयुक्त कामगार ऐवजी **"सचिव सहायक कामगार आयुक्त (ग्रावि),मुंबई"** असे वाचावे.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८१२०६१५३१४३४०१० असा आहे. तसेच सदर शासन शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.12.06 15:38:57 +05'30'
(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,

CamScanner

२) मा.विरोधी पक्ष नेता (विधानसभा/ विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव,
३) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
५) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
६) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,
८) कामगार आयुक्त, मुंबई, (१५प्रती)
९) अपर कामगार आयुक्त,पुणे/ नागपूर,
१०) कामगार उप आयुक्त, ठाणे /नाशिक/औरंगाबाद,
११) सल्लागार मंडळाचे अध्यक्ष (पत्राने)
१२) सल्लागार मंडळाचे सचिव व समितीचे सर्व सदस्य (कामगार आयुक्त, मुंबई यांचे मार्फत)
१३) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
१४) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक,
१५) उप सचिव (कामगार-७),यांचे स्वीय सहाय्यक,
१६) सर्व मंत्रालयीन विभाग,
१७) कामगार विभागातील सर्व कार्यासने,मंत्रालय,मुंबई,
१८) निवडनस्ती (कामगार-७).



CamScanner